# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक १४/०९/२०२२ (बुधवार)**

**(सकाळ)**

---

### चोरी

**१) पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील आठवडी बाजार जैन मंदीर काटोल येथे दिनांक १३/०९/२०२२ चे १९.०० वा. ते १९.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— जंयत वामनराव कंळबे, वय ४७ वर्ष, रा. गळपुरा मेनरोड, काटोल हे आठवडी बाजारात बाजार करण्याकरीता गेले होते. त्यादरम्यान त्यांच्या वरच्या शर्टच्या खिशातुन ओपो कंपनीचा के १० मोबाईल कि. १७,४९९/—रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास मपोहवा पंचफुला मोरे मो. नं. ९०४९६ ०७११५ या करीत आहे.

**२) पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत देहेगाव रंगारी येथे दिनांक ०६/०९/२२ चे १८.४५ वा. ते ०८/०९/२२ चे १०.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— छत्रपाल हरीभाउ गजभिये, वय ३४ वर्ष, रा. वाकी त सावनेर हे नागपुर येथिल खुशी मोहीत्रे यांचे गाडीवर मागील ७ वर्षापासुन ड्रायव्हरचे काम करतात व दररोज सकाळी ०९.३० वा. नागपुर ला जातात व रात्री ०८.०० वा. घरी परत गावी येतात. दि. ०६/०९/२०२२ रोजी संध्याकाळी ०६.४५ वा. दरम्यान नागपुर वरून फिर्यादी निघाले व ०७.४५ वा. दरम्यान देहेगाव रंगारी येथे बाजार असल्याने फिर्यादी भाजीपाला घेण्याकरीता थांबले भाजी घेवुन झाल्यानंतर पैसे देण्याकरीता शर्टच्या पॉकेटमध्ये पैसे काढण्याकरीता हात टाकला असता तेव्हा फिर्यादीचा रेडमी ९ प्रो कंपनीचा मोबाईल किं १३,०००/—रू. चा दिसला नाही. तेव्हा फिर्यादीने आजुबाजुला मोबाईलचा शोध घेतला परंतु दिसुन आला नाही. फिर्यादीचे मोबाईल मध्ये फोन पे व गुगल पे असल्याने फिर्यादी पैशाचा व्यवहार मोबाईलव्दारे कधी कधी करीत होते. फिर्यादीने लगेच पो स्टे खापरखेडा ला मोबाईल मिसींग ची रिपोर्ट दिली व दि ०८/०९/२०२२ रोजी सकाळी १०.०० वा. दरम्यान स्टेट बॅक ऑफ ईंडीया पाटणसांवगी शाखा येथे अकाउंट चेक केले असता फिर्यादीचे अकाउंट मधुन मोबाईलव्दारे ६३,१५०/—रू. चा व्यवहार केल्याचा समजले. त्यानंतर फिर्यादीच्या लक्षात आले की फिर्यादीच्या रेडमी ०९ प्रो कंपनीच्या मोबाईल किंमती १३,०००/—रू. चा अज्ञात आरोपीने चोरी करून मोबाईलव्दारे ६३,१५०/—रू. ची ऑनलाईन व्यवहार केला. त्याबाबत फिर्यादीने बॅकेत विचारपुस व खात्री करून फिर्यादीने बॅकेचे स्टेटमेंट व मोबाईलचे बिल सादर करून फिर्यादीचे रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. सहकलम ६६(ड) माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार गुरूप्रकाश मेश्राम मो नं ९८२३४५३१६९ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर